Shailesh Tilak
President
+91-94220 29656
Datta Aphale
General Secretary
+91-94231 50231

MAHARASHTRA JUDO ASSOCIATION
महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन
Affiliated to Judo Fedration of India &
Maharashtra Olympic Association
Trust Registration Number F-3967 Mumbai
568, Narayan Peth, Tilak Wada, Pune- 411030 | Email. : gs.mahajudo@gmail.com

सचिव / अध्यक्ष पुणे, 06/11/2025

जिल्हा ज्यूदो संघटना

सप्रेम नमस्कार,

विषय: पुनीत बालन गृप प्रस्तूत 52 वी महाराष्ट्र सिनियर राज्य ज्यूदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी -2025-26-मुंबई

कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनतर्फे पुनीत बालन गृप प्रस्तूत 52 वी महाराष्ट्र राज्य सिनियर राज्य ज्यूदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी-2025-26 मुंबई येथे आयोजित केल्या गेल्या आहेत. सिनियर गटाच्या राष्ट्रीय स्पर्धा ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडियातर्फे मणीपुर येथे डिसेंबर-2025 च्या दुसऱ्या आठवड्यात आयोजित केल्या जाणार असल्याचे कळते.

सदरील राष्ट्रीय स्पर्धांसाठी महाराष्ट्र 'बी' चा संघ निवडला जाणार असून सदरील स्पर्धा दिनांक 15 आणि 16 नोव्हेंबर 2025 रोजी शहाजी राजे भोंसले क्रीडा संकूल जयप्रकाश मार्ग, अंधेरी पश्चिम, मुंबई 400 053 येथे आपण आयोजिणार आहे.

आपल्या असोसिएशनला यंदाही पुण्याच्या पुनीत बालन गृप या प्रतिष्ठित संस्थेने ज्यूदो खेळ आणि ज्यूदोपटू यांच्या गतिशील प्रगतीसाठी अर्थसहाय्य केलेले आहे त्याबद्दल महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन श्री पुनीत बालन यांचे मनापासून आभार प्रकट करते.
श्री पुनीत बालन यांच्या दातृत्वामुळे सर्व अभ्यागत आणि खेळाडूंसाठी करण्यात येणारी भोजन आणि निवास व्यवस्था ही नि:शुल्क असेल.

**सदरील स्पर्धेचा अंतिम कार्यक्रम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे;-**

**सिनियर्स गटाच्या राज्य स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी:-** दि. **15 आणि 16 नोव्हेंबर 2025**

**रिपोर्टिंग:-** दि. **15 नोव्हेंबर 2025** रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत

**वजने आणि स्पर्धा सिनियर्स मुले आणि मुली :-** (सामन्यांचे हे वेळापत्रक अंदाजे असून यात परिस्थितीनुरूप बदल होवू शकतो.)

| दिनांक 15/11/2025 शनिवार | सर्व वजन गट अन-ऑफिशियल (मुले आणि मुली) वजने | सर्व वजन गट ऑफिशियल (मुले आणि मुली) वजने | दिनांक 16/11/2025 रविवार | सर्व वजन गट (मुले आणि मुली) स्पर्धा |
|---|---|---|---|---|
| | दु. 02.00 ते 04.00 | दु. 04.00 ते 06.00 | | स. 08.30 ते स्पर्धा संपेपर्यंत |
| स्पर्धा समाप्तीनंतर सर्वांचे आपापल्या गांवी परतणे आवश्यक आहे कारण 16/11/2025 रोजी रात्रीच्या निवासाची सोय नाही. | | | | |

सर्व नियुक्त पंचांनी दि. 15/11/2025 रोजी संध्याकाळी 07.00 वाजेपर्यंत स्पर्धास्थानी पोहोचणे अनिवार्य आहे.
पंच, प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांची बैठक:- दि. 15 नोव्हेंबर 2025 रोजी संध्याकाळी 06.30 वा. आयोजित बैठकीमध्ये लॉटस टाकले जातील. या बैठकीस सर्व संबंधित पंच, प्रशिक्षक आणि व्यवस्थापक यांना उपस्थित राहाणे अनिवार्य आहे.
राज्य स्पर्धा आणि निवड चांचणी स्पर्धा समाप्तीपश्चात लगेचच आपला संघ जाहीर करून राष्ट्रीय स्पर्धेसंदर्भात सूचना दिल्या जातील. या स्पर्धा समाप्त झाल्यानंतर आयोजित बैठकीस राज्य संघात निवड झालेल्या सिनियर्स गटाच्या खेळाडूंची उपस्थिती अनिवार्य आहे. या निवड स्पर्धेसाठी आपण दोन मॅट एरीया लावणार आहोत. याचा हेतु हा आहे की, एका दिवसाच्या कमी कालावधीमुळे स्पर्धा नीटपणे आयोजित व्हाव्यात. हे लक्षात घेता सर्व जिल्हा संघांना सूचना आहे की त्यांनी दिनांक 15 नोव्हेंबर 2025, शनिवारी उशिरात उशिरा दुपारी 11 वाजेपर्यंत स्पर्धास्थळी पोहोचावे. केवळ आपल्या सहकार्यानेच निर्धारित वेळेत हा कार्यक्रम यशस्वी होवू शकेल.

स्पर्धा प्रवेश शुल्क :- रुपये 500/- प्रती खेळाडू. हे शुल्क संघातील एकूण खेळाडूंच्या संख्येनुसार (म्हणजे रुपये 500/- प्रत्येक खेळाडू) याप्रमाणे रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने स्पर्धास्थळी श्री रविंद्र मेटकर, कोषाध्यक्ष, महाज्यूदो यांजकडे देऊन पावती घ्यावी.
निमंत्रित संघांसाठी प्रवेश शुल्काव्यतिरिक्त वर्षातील तीनही स्पर्धांचे एकत्रित आमंत्रित शुल्क जमा करण्याबाबतच्या सातारा येथील 23.07.2017 रोजी आयोजित वार्षिक सर्वसाधारण बैठकीमधील एकमताच्या ठरावाप्रमाणे, ज्या संघटनांनी शुल्क भरले नसतील त्या सर्व निमंत्रित संघांना सबज्युनियर्स-कॅडेट,ज्युनियर्स तसेच सिनियर्स स्पर्धांचे वार्षिक एकत्रित शुल्क रुपये 3,000/- स्पर्धास्थळी भरावे लागतील.
नोंदणी ओळखपत्र शुल्क: रु. 100/- प्रत्येकी (प्रत्येक खेळाडूची नोंदणी तीन वर्षातून फक्त एकदाच करायची आहे.)
हमी जमा:- रुपये 5,000/- प्रति जिल्हा संघ.
भोजन व्यवस्था- दिनांक 15 नोव्हेंबर रोजी दुपारचे मर्यादित भोजन आणि रात्रीचे पूर्ण भोजन तर 16 नोव्हेंबर रोजी न्याहारी आणि दोन भोजनाची मोफत सोय खेळाडू, पंच, प्रशिक्षक, व्यवस्थापक आणि पदाधिकारी यांच्यासाठी करण्यांत आलेली आहे.

निवास व्यवस्था: दिनांक 15/11/2025 रोजी सकाळी 08.00 पासून ते 16/11/2025 रोजी रात्री 09.00 वाजेपर्यंत केलेली आहे. कोणत्याही परिस्थितीत दिनांक 16 नोव्हेंबर रोजी निवासस्थान सर्व खेळाडूंना सोडावे लागेल.

प्रवेशिका अंतिम दिनांक:- 12/11/2025; विलंब प्रवेशिका 13/11/2025 रात्रौ 11.59 पर्यंत, विलंब शुल्क रु. 1500/-.

प्रवेशिका: नमुना प्रवेशिका सोबत जोडलेली असून ती व्यवस्थित टाईप करून दिनांक 12/11/2025 पर्यन्त महाराष्ट्र ज्यूदो संघटनेच्या वेबसाईटवर (www.mahajudo.com) अपलोड करावा. सर्व एंट्री (प्रवेशिका) ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारल्या जातील. यासाठी आपण आपल्या खेळाडूंची यादी त्यांच्या तपशिलांसह आणि प्रत्येकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो आधी तयार ठेवावा. (ऑनलाइन प्रवेशिका भरताना आपणास काही अडचण आली तर लगेचच श्री आदर्श शेट्टी – 98338-57072 यांच्याशी संपर्क साधावा.)

यदाकदाचित जर प्रवेशिकेमधील नावांमधील काही चुका झाल्यास सुधारित ओळखपत्रे किंवा प्रमाणपत्रे तयार करण्यासाठी दंड म्हणून रुपये 500/- (रू. पाचशे मात्र) आकारले जातील यासाठी प्रवेशिका भरतेवेळी योग्य ती खबरदारी घ्यावी.

प्रवेशिकेवर अध्यक्ष अथवा सचिव यांनी स्वाक्षरी करून हा फॉर्म अधिकृत संघ व्यवस्थापकांबरोबर स्पर्धेठिकाणी जन्मतारखेच्या दाखल्यांसह द्यावा. अध्यक्ष अथवा सचिव यांनी स्वाक्षरी न केलेल्या जिल्हा संघांची प्रवेशिका नाकारली जाऊ शकते हे कृपया लक्षात घ्यावे.

- प्रवेशिकेबरोबर प्रत्येक खेळाडूचे जन्मतारखेचे मूळ (ओरिजिनल) दाखले आणि त्यांच्या झेरॉक्स-प्रती जमा कराव्या तसेच एक पासपोर्ट आकाराचा फोटो जमा करावा.
- मूळ कागदपत्रे पाहिल्यावर झेरॉक्स दाखले प्रमाणित करून MJA रेकॉर्डसाठी ठेवले जातील आणि मूळ कागदपत्रे जिल्हा संघ व्यवस्थापकांकडे लगेचच दिली जातील. त्यामुळे संघ व्यवस्थापकांनी झेरॉक्स दाखले सत्यापित झाल्यावर मूळ दाखले आठवणीने न्यावेत. ही जबाबदारी संघ व्यवस्थापकांची असेल. ते संघ व्यवस्थापकांनी मूळ दाखले परत न नेल्यास / गहाळ झाल्यास राज्य ज्यूदो संघटनेचे कोणतेही पदाधिकारी, आयोजक, संघटनेचे पदाधिकारी अथवा स्पर्धेसाठी नेमलेले कोणतेही तांत्रिक अधिकारी जबाबदार असणार नाहीत याची नोंद घ्यावी आणि संघ व्यवस्थापकांना काम झाल्यावर दाखले परत घेण्याच्या सूचना जिल्हा सचिवांनी गांभिर्याने द्याव्यात.
- जिल्ह्याच्या प्रवेशिकांमधे दिल्या गेलेल्या वजनगटामध्येच खेळाडूला खेळावे लागेल.

स्पर्धा नियम: स्पर्धा जेएफआयच्या नूतन प्रचलित नियमांप्रमाणे आयोजिल्या जातील.

जिल्हा सिनियर संघासह एक व्यवस्थापक आणि एक प्रशिक्षक (एकूण फक्त दोन) अनिवार्य असून हे पदाधिकारी संघासोबत नसल्यास संघास निवास-भोजनाची व्यवस्था करून दिली जाणार नाही.

| सिनियर्स गट - वयाची अट | वजनगट मुले | वजनगट मुली |
|---|---|---|
| खेळाडूचे वय वर्ष 2025 मध्ये 15 वर्षे पूर्ण केलेले हवे.<br>खेळाडू जन्मवर्ष 2010 आणि त्यापूर्वी.<br><br>(18 वर्षाखालील खेळाडूंच्या पालकांकडून जिल्हा संघटनांनी खाली दिलेले नमूना हमीपत्र घेऊन ते जपून ठेवावेत. या परिपत्रकासोबत हमीपत्र दिलेले आहे. हमी पत्राशिवाय 18 वर्षाखालील खेळाडूंना जिल्हा चाचणी स्पर्धेत खेळू देवू नये आणि या राज्य स्पर्धेसाठी पाठवू देखील नये.) | 60 किलोखाली,<br>66 किलोखाली,<br>73 किलोखाली,<br>81 किलोखाली,<br>90 किलोखाली,<br>100 किलोखाली<br>आणि 100 किलोवर | 48 किलोखाली,<br>52 किलोखाली,<br>57 किलोखाली,<br>63 किलोखाली,<br>70 किलोखाली,<br>78 किलोखाली<br>आणि 78 किलोवर |

वयाचा दाखला:- फेडरेशनने या आधीच्या परिपत्रकात स्पष्ट केल्याप्रमाणे. (वयवर्ष वगळता)

जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात जेएफआयच्या नियमाप्रमाणे खालील तीन मूळ अधिकृत प्रतिमधे त्यांच्या झेरॉक्ससह वयाचा दाखला आणणे गरजेचे आहे. याशिवाय खेळाडूला खेळण्यास परवानगी मिळणार नाही.

- अ) महानगरपालिका / पंचायत समिती अथवा समरूप शासकिय अधिकृत व्यक्तिद्वारा जारी वयाचा दाखला / विभागातील सक्षम मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेला दाखला,
- ब) मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेले प्रमाणपत्र ( यामधे जन्मतारीख, वडिलांचे नाव, विद्यार्थ्याचा शिकत असलेला वर्ग, पत्ता, टेलिफोन क्रमांक, आणि शाळेचा फॅक्स आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असायला हवा. ही माहिती विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोवर रबरी शिक्का आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकीत (अटेस्टेड) केलेले हवे.
- क) भारत सरकारतर्फे जारी केलेल्या आधार कार्डाची मूळ प्रत

हे तीनही दाखले अनिवार्य असून याशिवाय खेळाडूस खेळू दिले जाणार नाही. (दाखल्याच्या प्रमाणासाठी जेएफआयचे स्पर्धेसंदर्भातील मूळ इंग्रजी परिपत्रक ग्राह्य धरले जाईल. खेळाडुंचे वय हे कॅलेंडर वर्षाप्रमाणे जानेवारी ते डिसेंबर असे गृहीत धरले जाईल.)

फेमीनिटी कंट्रोल- ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडियाने परिपत्रकात सूचित केल्याप्रमाणे प्रत्येक महिला खेळाडूस स्त्रीरोग तज्ञांतर्फे इंग्रजी अथवा हिन्दी भाषेत जारी केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र आणावे लागेल ज्यात सेक्स आणि नॉन प्रेग्नंसी रिपोर्ट असेल. सदरील प्रमाणपत्र राज्य स्पर्धेसाठी आवश्यक नाही परंतु जे खेळाडू या स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडले जातील अशा महिला खेळाडूंनी मात्र सदरील प्रमाणपत्र स्वत: बरोबर ठेवावे लागेल.

आजपर्यंतचा अनुभव असा आहे की राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याच्या संघामध्ये निवडल्या गेलेल्या खेळाडूंपैकी काही खेळाडू स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी सूचना देताना हजर नसतात, तेंव्हा संबंधित खेळाडू अनुपस्थित राहू नयेत याची काळजी संघ व्यवस्थापकांनी घ्यावी आणि या मिटिंगसाठी खेळाडू उपस्थित रहाण्याची ताकीद द्यावी.

फेडरेशननी कळविल्याप्रमाणे राष्ट्रीय स्पर्धेच्या सहभागासाठी निर्धारित ज्यूदोगी घालूनच खेळावे लागेल. यासाठी अशा ज्यूदोगीची उपलब्धता करणे ही जबाबदारी राज्य संघामध्ये निवडल्या गेलेल्या प्रत्येक खेळाडूची वैयक्तिक जबाबदारी असेल.

केंद्र सरकारच्या धोरणानुसार डोपिंगबाबत कडक धोरण राबवले जात असल्याने डोपिंग टेस्ट गांभियनि केल्या जात आहेत. खेळाडूंच्या अशा चाचणी करून दोषी खेळाडूंना खेळण्यास बंदी आणल्याचेही सर्व राज्य संघटनांना फेडरेशनने कळवले आहे. त्यामुळे आपण आपल्या जिल्ह्याच्या संघामधील प्रत्येक खेळाडूकडे जातीने लक्ष देवून खेळाडू अशा गैर गोष्टी करत नाहीत याची खातरजमा करावी. डोपिंग टेस्टची सुरुवात राज्य स्पर्धेपासून करण्याचाही शासनाचा मानस आहे याची जाणीव खेळाडूंना करून द्यावी जेणेकरून मेडलच्या छोट्या मोहापायी खेळाडूने आपले संपूर्ण करियर आणि आयुष्य वाया घालवण्यापासून आपण सर्वांनी परावृत्त करावे.

राज्य संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूला राष्ट्रीय स्पर्धा सहभाग बंधनकारक आहे. संयुक्तिक कारणाशिवाय अथवा योग्य वेळी पूर्वकल्पना न देता राष्ट्रीय स्पर्धेस अनुपस्थित राहून पर्यायाने राज्याच्या खेळाडूंवर अन्याय करणाऱ्या खेळाडूवर निलंबनाची आणि आर्थिक दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव राज्य संघटनेनी पारित केला आहे.

महाराष्ट्र ज्यूदो संघटना कोणत्याही परिस्थितीत कोणाचेही गैरवर्तन कदापिही सहन करणार नाही. स्पर्धा आणि निवास या ठिकाणी असभ्यपणा, मोठयाने आवाज करणे, मोबाईलवर इतरांना त्रास होईल असा त्याचा वापर करणे इत्यादी गैरवर्तन कोणीही करू नये. निवास, भोजन आणि खेळण्याचा परिसर येथे गैरवर्तन केल्याची माहिती कळवण्याची जबाबदारी सामायिक राहील. याचबरोबर मालमत्तेचे नुकसान कोणीही आणि कोणत्याही कारणाने केल्यास त्या संबंधित संघाकडून तो खर्च वसूल तर केलाच जाईल शिवाय संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. महाराष्ट्राच्या संघातील त्या जिल्ह्याचे स्थान जाणे अथवा जिल्ह्याचे निलंबनदेखील होवू शकते याची गंभीर नोंद घेऊन, आपल्या शिस्तप्रिय खेळाची परंपरा जबाबदारीने सर्वांनीच पुढे न्यावी ही सर्वांनाच आग्रहाची विनंती. यासाठी संघव्यवस्थापक आणि संघाबरोबरील प्रशिक्षकांना प्रत्येक जिल्ह्याच्या सचिव / अध्यक्षांनी जागरूक रहाण्याच्या सूचना द्याव्यात.

- वैद्यकीय / अपरिहार्य कारणाशिवाय मॅटवर येवून न खेळता वॉकओव्हर देणाऱ्या खेळाडूस / संघास दरवेळी रू 100/- दंड केला जाईल. कारणाची सत्यता राज्य संघटना तांत्रिक समिती सचिव पडताळून पाहातील.

संघातील खेळाडूंच्या विम्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्याची असेल. खेळाडूंना स्पर्धेच्या कालावधीमध्ये अथवा स्पर्धेकरिता येताना अथवा स्पर्धेहून आपल्या गावी परतताना कोणत्याही घटनेमुळे होणाऱ्या इजांची / दुर्घटनांची जबाबदारी संयोजक संघटना अथवा महाराष्ट्र ज्यूदो संघटनेवर किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर रहाणार नाही. मात्र स्पर्धेदरम्यान प्राथमिक उपचाराची सोय आयोजकांकडून स्पर्धा ठिकाणी करण्यात येईल. पुढील गंभीर उपचाराचा खर्च आणि सोय ज्या-त्या संघास करावी लागेल याची नोंद घ्यावी.
सभासद नसणाऱ्या जिल्हा ज्यूदो संघटनेस स्पर्धेमधे सहभाग देण्या-न देण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्यूदो संघटनेकडे सुरक्षित असेल.
प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडू हा त्या जिल्ह्यातील रहिवासी असायला हवा. अर्थात कोणताही खेळाडू स्वत:चा जिल्हा सोडून इतर जिल्ह्यातून खेळताना आढळल्यास त्यावर कारवाई होईल तसेच त्यास मदत करणाऱ्या संबंधित क्लब / जिल्हयावरही कारवाई होईल.
सर्व पत्रव्यवहार ज्यूदो संघटनेच्या लेटरहेडवर प्राधिकृत व्यवस्थापक अथवा सचिव यांच्या स्वाक्षरीने व्हावा.

- ✓ आयजेएफच्या/जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) अथवा कोणत्याही प्रसंगी रेफरीच्या निर्णयावर आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे, रेफरीचे लक्ष विचलित करणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येऊ शकते.
- ✓ रेफरींचा निर्णय अंतिम असेल. रेफरीच्या निर्णयाबाबत आक्षेप असल्यास फक्त संघाच्या व्यवस्थापकांनी या संदर्भात मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याशी संपर्क साधावा.
- ✓ आक्षेपार्ह सामन्याचे रेकॉर्डिंग पहाताना राज्य संघटनेच्या अधिकृत कॅमेरामधीलच रेकॉर्डिंग पाहिले जाईल, वैयक्तिक मोबाइलचे रेकॉर्डिंग गृहीत धरले जाणार नाही.
- ✓ राष्ट्रीय स्पर्धांचे परिपत्रक अजून आपल्याला प्राप्त झाले नाही. जर स्पर्धा नियमात काही बदल ज्यूदो फेडरेशनद्वारे ऐनवेळेस कळवले गेल्यास तसे बदल विनासूचना अंगिकारण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्यूदो संघटना राखून ठेवत आहे.
- ➢ राष्ट्रीय स्पर्धा आयोजकांकडून स्पर्धकांस एव्हिटी (AVT- Age Verification Test Report) प्रमाणपत्र मागितले जाऊ शकते यासाठी प्रत्येकाने याची नोंद घेऊन या प्रमाणपत्राची उपलब्धता स्वत:जवळ ठेवावी. कोणत्याही स्पर्धकाच्या वयासंदर्भात शंका आल्यास त्या खेळाडूची वैद्यकीय चाचणी करण्याचा अधिकार फेडरेशनकडे सुरक्षित आहे. राज्य स्पर्धेसाठी या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.
- ➢ राज्य स्पर्धा आणि निवड चाचणी स्पर्धा आणि त्यापुढील फेडरेशनच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी तसेच नॅशनल गेम्ससाठी खेळाडूच्या विमा संदर्भात जबाबदारी प्रत्येक वैयक्तिक खेळाडूची आहे. हे हमीपत्र जिल्हा संघटनांनी त्यांच्या कार्यालयात अभिलेखासाठी ठेवणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र ज्यूदो संघटनेच्या सर्व उपक्रम / कार्यक्रमाबाबत माहिती सर्वांना कायम उपलब्ध व्हावी यासाठी इंटरनेटवर www.mahajudo.com हे संकेतकेंद्र उपलब्ध असून इच्छुकांनी कृपया यावरून माहिती घ्यावी. कळावे,
शुभेच्छांसह,

आपला विश्वासू,

दत्ता आफळे
महासचिव, महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन

संलग्न: 1. हमीपत्र, 2. दहावी-बारावी खेळाडूंची यादी, 3. प्रवेशिका

माहिती साठी संपर्क;

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री दत्ता आफळे | महासचिव, महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन | 9422029656 | gs.mahajudo@gmail.com | ज्यूदो संदर्भातील अडचणीसाठी |
| श्री आदर्श शेट्टी | महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन | 9833857072 | adarsh.shetty07@outlook.com | वेबसाईट, एंट्रीफॉर्म भरणे-अपलोड यासाठी |
| श्री विकास देसाई | | 9421676837 | vikas.acem@gmail.com | |
| श्री सुरेश कनोजिया | मुंबई ज्यूदो असोसिएशन | 98201 34199 | स्पर्धा कालावधी दरम्यान भोजन-निवास आदीबाबत प्रश्न | |
| श्री सुरेश समेळ | | 98201 95439 | | |

प्रति,
मा. सचिव
____________________ जिल्हा ज्यूदो संघटना

विषय: ज्यूदो स्पर्धेच्या सहभागासाठी खेळाडूच्या पालकांचे परवानगी पत्र आणि हमीपत्र

महोदय / महोदया,

मी या पत्राद्वारे माझा पाल्य (पूर्ण नाव) कु. इयत्ता
यास महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनद्वारे दिनांक 15 आणि 16/11/2025 दरम्यान मुंबई येथे आयोजित सिनीयर्स (मुले-मुली) राज्य स्पर्धा आणि निवड चांचणी ज्यूदो स्पर्धा-2025-26, यामध्ये ज्यूदो खेळाडू म्हणून सहभागी होण्यासाठी परवानगी देत आहे.
मी असेही इथे नमूद करतो की,

1. माझ्या पाल्यास ऐकणे, पहाणे आणि बोलणे आदी क्रियांबाबत कोणतीही अंशत:देखील कमतरता / व्यंग नाही. माझा पाल्य मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या पुर्णपणे सक्षम आहे.
2. माझ्या पाल्य 15 ते 18 वर्षे वयोगटात जरी असला तरीही त्यास सदरील खुल्या राज्य ज्यूदो स्पर्धेमधील वयाबाबतीतील खुल्या प्रवर्गात (म्हणजे 15 वर्षांपासून त्यावरील खेळाडू) खेळू देण्यास मी माझ्या जबाबदारीवर अनुमती देत आहे.

मला ज्यूदो खेळातील तसेच खेळण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रवासादरम्यानच्या जोखीमींची पूर्वकल्पना जिल्हा संघटनेद्वारे दिलेली आहे.
मला हेही माहिती आहे की, माझ्या पाल्याचे प्रशिक्षक, संघाचे व्यवस्थापक आणि जिल्हा संघटनेचे पदाधिकारी माझ्या पाल्याच्या सुरक्षेसाठी आवश्यक आणि योग्य ती सर्व काळजी घेत आहेत.
योग्य ती सर्व काळजी घेऊनही, जर कदाचित कोणतीही अप्रिय घटना घडल्यास मी माझ्या पाल्याचे प्रशिक्षक, संघाचे व्यवस्थापक आणि जिल्हा अथवा राज्य ज्यूदो संघटनेचे कोणातेही पदाधिकारी यांना जबाबदार धरणार नाही.
मी या पत्राद्वारे अशीही हमी देतो की, माझा पाल्य सुरक्षिततेचे सर्व नियम काटेकोरपणे पाळेल आणि त्यांनी ते आयुष्यात नेहमीच पाळावेत यासाठी मी त्याला मार्गदर्शनही केलेले आहे.
कृपया आपातकालिन स्थितीसाठी माझ्या पाल्याबाबतीत खालील वैद्यकीय नोंद ठेवावी;
(लागू नसल्यास लागू नाही असे लिहावे)

ॲलर्जी: ____________________
नेहमीची औषधे घेत असल्यास: ____________________
काही आजार / जखम ____________________
टिटॅनियसचे इंजेक्शन कधी घेतले आहे. ____________________
रक्त गट ____________________

पालकांचे नांव आणि स्वाक्षरी ____________________

तारीख: /11/2025; ठिकाण: ____________

52 वी सिनियर्स (मुले-मुली) राज्य ज्यूदो स्पर्धा, मुंबई
आणि राष्ट्रीय निवड चांचणी
दिनांक : 15 आणि 16 नोव्हेंबर 2025

जिल्हा ज्यूदो असोसिएशनचे नाव: ______________________________

दहावीच्या विद्यार्थी खेळाडूंची यादी

| क्र. | खेळाडूचे पूर्ण नाव | जन्मतारीख | वयोगट | वजनगट | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

बारावीच्या विद्यार्थी खेळाडूंची यादी

| क्र. | खेळाडूचे पूर्ण नाव | जन्मतारीख | वयोगट | वजनगट | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सचिवांची स्वाक्षरी ______________________

सचिवांचे नाव ______________________

रबरी शिक्का:

**52nd SENIOR STATE JUDO CHAMPIONSHIPS**
**& National Selection Trials**
**15th & 16st NOVEMBER 2025, MUMBAI**
**Entry Form (WOMEN)**

Name of District:

| Weight Category | SURNAME | NAME | FATHERS NAME | Date of Birth | Aadhaar Card Number | JFI Registration Number |
|---|---|---|---|---|---|---|
| Below 48 Kg | | | | | | |
| Below 52 Kg | | | | | | |
| Below 57 Kg | | | | | | |
| Below 63 Kg | | | | | | |
| Below 70 Kg | | | | | | |
| Below 78 Kg | | | | | | |
| Above 78 Kg | | | | | | |
| COACH | | | | | | |

I have verified the Birth Certificates / Documents of the above Players and found correct.

**President/Secretary**
**Signature & Stamp**

**The Entry Form must be neatly typed in the specified sequence.**

**$52^{nd}$ SENIOR STATE JUDO CHAMPIONSHIPS**
**& National Selection Trials**
**$15^{th}$ & $16^{st}$ NOVEMBER 2025, MUMBAI**
**Entry Form (MEN)**

Name of District:

| Weight Category | SURNAME | NAME | FATHERS NAME | Date of Birth | Aadhaar Card Number | JFI Registration Number |
|---|---|---|---|---|---|---|
| Below 60 Kg | | | | | | |
| Below 66 Kg | | | | | | |
| Below 73 Kg | | | | | | |
| Below 81 Kg | | | | | | |
| Below 90 Kg | | | | | | |
| Below 100 Kg | | | | | | |
| Above 100 Kg | | | | | | |
| Manager | | | | | | |

I have verified the Birth Certificates / Documents of the above Players and found correct.

**President/Secretary**
**Signature & Stamp**

**The Entry Form must be neatly typed in the specified sequence.**